# महाराष्ट्र शासन

क्र. मअसे/५५-बी/२०१७/३७३

टेलि : २६६७७५५५

फॅक्स : २६६६ ०२८७

Email : supdt@mahafireservice.gov.in
Website: www.mahafireservice.gov.in

**महाराष्ट्र अग्निशमन सेवा संचालनालय,**
महाराष्ट्र अग्निशमन सेवा अकादमी,
विद्यानगरी, हंस भुग्रा मार्ग,
सांताक्रुझ (पूर्व), मुंबई-४०० ०९८.

दिनांक : २३.०२.२०१७

## प रि प त्र क

विषय : दि.१४ ते २० एप्रिल, २०१७ या कालावधीत
"अग्निशमन सेवा सप्ताह" पाळण्यांबाबत
निबंध व चित्रकला स्पर्धा आयोजित करणे.

केंद्रीय गृह मंत्रालयाच्या सूचनेनुसार दि.१४ ते २० एप्रिल, २०१७ या कालावधीत संपूर्ण राज्यात **अग्निशमन सेवा सप्ताह** पाळण्यांत येणार आहे. या सप्ताहाचा एक भाग म्हणून प्राथमिक व माध्यमिक शाळेतील इयत्ता ५ वी ते ९ वीच्या विद्यार्थी / विद्यार्थीनींसाठी खालील विषयानुसार राज्यस्तरीय निबंध व चित्रकला स्पर्धा आयोजित करण्यांत येणार आहे.

***निबंध व चित्रकला स्पर्धेसाठी विषय*** :

मराठी - " आपले जीवन व संपत्ती वाचविणारा खरा सोबती - अग्निशामक "
हिंदी - " फायरमैन — जीवन और संपत्ति को बचाने में आपका साथी "
इंग्रजी - " FIREMAN – YOUR PARTNER FOR SAVING LIFE AND PROPERTY"

**स्पर्धेसंबंधी नियम व अटी पुढीलप्रमाणे आहेत.**

१. दोन्ही स्पर्धा फक्त इयत्ता ५ वी ते ९ वीच्या विद्यार्थी / विद्यार्थीनीसाठी आहे.

२. या स्पर्धेत महाराष्ट्रातील सर्व शाळा सहभागी होऊ शकतात.

३. दोन्ही प्रकारच्या स्पर्धा शाळा प्रमुखांनी त्यांच्या सोयीनुसार त्यांच्या शाळेतच आयोजित करावयाच्या असून भाग घेणा-या स्पर्धकांपैकी निबंध व चित्रकला स्पर्धा यांच्या प्रत्येकी अधिकतम सहा उत्कृष्ट प्रवेशिका सिलबंद पाकीटातून **दि.३१ मार्च, २०१७** पर्यंत या कार्यालयास पाठवावयाच्या आहेत.

४. स्पर्धेसाठी कागद, पेंटींग पेपर, रंग व इतर साहित्य स्पर्धकांनी स्वतः आणावे.

५. प्रत्येक स्पर्धेचा कालावधी दिड तास असेल.

६. निबंध स्पर्धेसाठी १३" x ८" आकाराचा ओळीचा कागद वापरावा. निबंध केवळ **मराठी, हिंदी व इंग्रजी भाषेत** कमाल ५०० शब्दांपर्यंत असावेत.

७. चित्रकला स्पर्धेसाठी १५" x ११" आकाराचा ड्रॉईंग पेपर वापरावा.

८. प्रत्येक स्पर्धेसाठी विजेत्या स्पर्धकांना ट्रॉफी व प्रमाणपत्रे **दि.२० एप्रिल, २०१७** रोजी होणा-या अग्निशमन सेवा सप्ताहाच्या समारोप समारंभ प्रसंगी प्रदान करण्यांत येतील. यासाठी त्यांना कोणत्याही प्रकारचा प्रवास/दैनिक भत्ता अनुज्ञेय असणार नाही.

(१) प्रथम क्रमांक : ट्रॉफी व प्रमाणपत्र

(२) व्दितीय क्रमांक : ट्रॉफी व प्रमाणपत्र

(३) तृतीय क्रमांक : ट्रॉफी व प्रमाणपत्र

(४) उत्तेजनार्थ (तीन बक्षिसे): केवळ प्रमाणपत्र

९. विजयी स्पर्धकांना समारंभात हजर राहण्याबाबत पत्राने कळविण्यांत येईल.

**१० निबंध व चित्रकला स्पर्धेतील स्पर्धकांनी प्रवेशिकाच्या मागील बाजूस स्वतःचे संपूर्ण नांव, इयत्ता, घरचा पूर्ण पत्ता, दूरध्वनी /मोबाईल क्रमांक, शाळेचे नांव, पत्ता व दूरध्वनी क्रमांक सुवाच्च अक्षरात लिहिणे आवश्यक आहे.**

११. शाळा प्रमुखांना प्रत्येक स्पर्धेसाठी अधिकतम सहा प्रवेशिका स्वतंत्रपणे पाठवावयाच्या असून प्रत्येक पाकीटावर ठळक अक्षरात **"अग्निशमन सेवा सप्ताह-२०१७-निबंध-चित्रकला स्पर्धा"** प्रवेशिका असा उल्लेख करावा. शाळा प्रमुखांनी प्रवेशिका पाठवितांना त्यावर स्पर्धकाचे संपूर्ण नांव, पत्ता व दूरध्वनी या बाबी नोंदविल्या आहेत किंवा कसे याची खात्री करुन घ्यावी.

१२. निबंध स्पर्धा व चित्रकला स्पर्धा यांच्या परीक्षकांचा निकाल अंतिम मानण्यांत येईल व या संदर्भात कोणत्याही प्रकारचा पत्रव्यवहार केला जाणार नाही.

१३. या संदर्भात अधिक माहिती आवश्यक असल्यास दूरध्वनी क्र.२६६७ ७५५५ वर कृपया संपर्क साधण्यांत यावा.

( प्र.सु.रहांगदळे )
संचालक,
महाराष्ट्र अग्निशमन सेवा